दैनिक साहसिक
संमिश्र





# आडसाली उसामध्ये आंतरपिके

**आडसाली उसाची लागवड १५ जुलै ते १५ ऑगस्ट या कालावधीत केली जाते. आडसाली उसाचा कालावधी १६ ते १८ महिन्यांचा असतो. उसाची लागवड केल्यानंतर पूर्ण उगवण होण्यासाठी सहा ते आठ आठवड्यांचा कालावधी लागतो. सुरुवातीच्या कालावधीमध्ये उसाची वाढ हळू होत असल्यामुळे उसाच्या दोन सऱ्यांमध्ये आंतरपीक घेण्यासाठी भरपूर मोकळी जागा असते.**

उसामध्ये आंतरपीक घेतल्याने निव्वळ उत्पन्नात वाढ होते. उसासाठी बियाणे, खते व आंतरमशागतीसाठी केलेला खर्च आंतरपिकाच्या उत्पन्नातून निघून जातो. आंतरपीक घेतल्याने तणांच्या वाढीवर परिणाम होऊन तणांचे प्रमाण कमी होते. आडसाली उसामध्ये द्विदल वर्गातील भुईमूग, सोयाबीन व चवळी ही पिके किंवा मुळा, कोथिंबीर, मेथी व कांदा यासारखी भाजीपाल्याची आंतरपिके घेता येतात. द्विदल वर्गातील आंतरपिके घेतल्यास जमिनीचा पोत सुधारतो.

ऊस बेणेप्रक्रिया- कांडीवरील खवले कीड, पिठ्या ढेकूण तसेच काणी रोगाच्या बंदोबस्तासाठी ३०० मि.लि. मॅलॅथिऑन + १०० ग्रॅम कार्बेन्डाझिम १०० लीटर पाण्यात मिसळून या द्रावणात बेणे १० मिनिटे बुडवावे. रासायनिक बेणे प्रक्रियेनंतर अर्ध्या तासाने १० किलो ॲझेटोबॅक्टर व १.२५ किलो स्फुरद विरघळविणारे जीवाणू प्रती १०० लीटर पाण्यात मिसळून तयार केलेल्या द्रावणात बेणे अर्धा तास बुडवून नंतर लागवड करावी.

आंतरपिकांसाठी बीजप्रक्रिया-

कांदा - थायरम (तीन ग्रॅम प्रतिकिलो बियाणे)

सोयाबीन - सोयाबीन गटाचे रायझोबियम जीवाणू संवर्धक २५० ग्रॅम आणि स्फुरद विरघळणारे जीवाणू संवर्धक २५० ग्रॅम प्रती दहा किलो बियाण्यासाठी.

भुईमूग - रायझोबियम जीवाणू संवर्धक २५० ग्रॅम आणि स्फुरद विरघळणारे जीवाणू संवर्धक २५० ग्रॅम प्रती दहा किलो बियाण्यासाठी.

लागवडीची पद्धत:-

सरीवरंबा पद्धत (पारंपरिक पद्धत) - हलक्या जमिनीत ९० सें.मी., मध्यम जमिनीत १०० सें.मी. व भारी जमिनीत १२० ते १५० सें.मी. अंतरावर सऱ्या वरंबे पाडून उसाची लागण सरीमध्ये केल्यानंतर दुसरे पाणी देण्याच्या अगोदर वरंब्याच्या दोन्ही बगलेत आंतरपिकाची टोकण पद्धतीने लागण करावी.

पट्टा पद्धत - या पद्धतीत ७५ सें.मी. (२.५ फूट) किंवा ९० सें.मी. (तीन फूट) अंतरावर सऱ्या पाडून प्रत्येक दोन सऱ्यांत ऊस लागवड करून तिसरी सरी मोकळी सोडावी. अशा प्रकारे जोडओळ लागवड करून राहिलेल्या १५० सें.मी. (पाच फूट) किंवा १८० सें.मी. (सहा फूट) पट्ट्यात आंतरपिकाची लागवड करावी. या पद्धतीत उसाच्या उत्पादनात घट येत नाही व आंतरपीक निघाल्यानंतर उसात आंतरमशागत करणे सुलभ जाते.

# तूर आंतरपीक लागवड

**तुरीचे घरचे बियाणे असल्यास पेरण्यापूर्वी उगवणशक्ती तपासून घ्यावी. जमिनीच्या प्रकारानुसार जातींची निवड करावी. पेरणीपूर्वी बीजप्रक्रिया करावी. आंतरपीक पद्धतीचा अवलंब करावा. सुधारित अंतराने लागवड करावी. माती परीक्षणानुसार रासायनिक खतांची मात्रा द्यावी.**



विविध पिकांसोबतच्या आंतरपीक पद्धतीत तुरीची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. यासाठी १६५ ते १९० दिवस कालावधीत तयार होणाऱ्या वाणांची निवड करावी.

१) ऑक्टोबर आणि त्यापुढे पाऊस न आल्यास किंवा कमी आल्यास मध्यम आणि हलक्या जमिनीवर तुरीला फुलोऱ्यानंतर पाण्याचा ताण पडतो. त्याचा उत्पन्नावर अनिष्ट परिणाम होतो. अशा ठिकाणी १३५ ते १५० दिवसांत तयार होणाऱ्या वाणांची लागवड करावी. साधारणपणे आपल्याकडे १२५ ते १३० दिवसांत तयार होणारे आय.सी.पी.एल. ८७ (प्रगती), टी.एटी.-१० आणि टी विशाखा-१ हे वाण विकसित करण्यात आले आहेत. ए.केटी. ८८११ हा वाण पाऊसमानाप्रमाणे १४५ ते १६५ दिवसांत तयार होतो. कमी पाऊस झाल्यास याचे १३५ ते १४० दिवसांत उत्पादन मिळते. असे वाण मध्यम ते हलक्या जमिनीत लागवडीसाठी वापरावेत.

२) भारी पिकाऊ जमिनीत आशा, सी-११, वीएसएमआर ७३६, तर मध्यम जमिनीत मारोती, वीडीएन ७०८ तारा, विपुला या वाणांची लागवड करावी.

३) उताराकडील भागात पाणी साचल्यामुळे पिकाची हानी होते. तूर पिकांत पाणी साचल्यास वाढ खुंटते, पाने गळतात. पर्यायाने वाढीवर परिणाम होऊन उत्पन्न कमी येते. हळव्या वाणांचा फुलोऱ्यावर येण्याचा काळ लवकर असल्यामुळे त्यांच्यामध्ये हा परिणाम जास्त प्रमाणात दिसतो.

४) जमिनीचा चिवडपणा कमी होण्यासाठी पेरणीपूर्वी सेंद्रिय खतांचा वापर वाढवावा. सेंद्रिय खतांची कमतरता लक्षात घेता शेतात निंदणाचा, तसेच इतर काडीकचरा आणि पालापाचोळा जमिनीतच कुजवण्याचा उत्तम पर्याय ठरू शकतो.

५) तुरीच्या पेरणीसाठी सरी ओरंबा पद्धतीचा अवलंब करून बी सरीवर टोकल्यास सपाट पेरणीपेक्षा सुमारे १५ टक्के जादा उत्पन्न मिळते असे प्रयोगांत आढळले आहे. चिवड जमिनीत ओरंब्यावर उगवलेल्या रोपांच्या मुळांना अतिपावसामुळे हानी होत नाही. त्यामुळे अशा ठिकाणी ओरंब्यावरची पेरणी जास्त उपयुक्त ठरते.

६) घरचे बियाणे पेरण्यापूर्वी उगवणशक्ती तपासून घ्यावी. त्यासाठी कुंडीमध्ये १०० किंवा २०० बी मोजून मातीने झाकावे. त्याला चार ते पाच दिवस ओले राहण्याकरिता रोज पाणी घालावे. सहा दिवसांनंतर उगवलेल्या बिया मोजून उगवण्याची टक्केवारी काढावी. अशाचप्रकारे टीपकागदामध्ये (ब्लॉटिंग पेपर) किंवा ओल्या कापडामध्ये उगवणशक्ती मोजता येईल.

७) बियाणे पेरण्यापूर्वी थायरम किंवा कॅप्टन किंवा कार्बेन्डाझिम या बुरशीनाशकाची चार ग्रॅम प्रती किलो प्रमाणे बीजप्रक्रिया करावी किंवा पाच ग्रॅम ट्रायकोडर्माची प्रती किलो बियाण्यास बीजप्रक्रिया करावी. बीजप्रक्रियेमुळे रोगाला आळा बसतो आणि उगवण चांगली होऊन रोपांची जोमदार वाढ होते.

८) रासायनिक बीजप्रक्रियेनंतर रायझोबियम जीवाणू संवर्धक आणि स्फुरद विरघळविणाऱ्या जीवाणू संवर्धकाची बीजप्रक्रिया करावी. यासाठी १० किलो बियाण्यास प्रत्येकी २५० ग्रॅम जीवाणू संवर्धकाची बीजप्रक्रिया करावी.

९) तुरीला माती परीक्षणानुसार पेरणीपूर्वी हेक्टरी २५ किलो नत्र आणि ४० कि. स्फुरद द्यावे. रायझेमीयम आणि पी.एस.बी. जीवाणू संवर्धकाची बीजप्रक्रिया केल्यास नत्र, स्फुरदाची मात्रा ५० टक्के दिली तरी उत्पादनात फारसा फरक पडत नाही. असे प्रयोगात दिसून आले आहे.

माती परीक्षणात गंधक आणि जस्ताची कमतरता आढळल्यास नत्र आणि स्फुरदयुक्त खतासोबत हेक्टरी २० किलो गंधक आणि दोन ते पाच किलो झिंक सल्फेट द्यावे. नत्राची मात्रा अमोनिअम सल्फेटद्वारा आणि स्फुरद खताची मात्रा सिंगल सुपर फॉस्फेटद्वारे दिल्यास गंधकाची मात्रा या दोन्ही खतांद्वारे मिळू शकते.

पेरणीचे नियोजन:-

१) तुरीच्या पिकाची वाढ ही पेरणी केव्हा झाली यावर अवलंबून असते. सर्वसाधारण परिस्थितीत तुरीची पेरणी जुलैच्या पहिल्या आठवड्यात करण्याची शिफारस करण्यात आली आहे. परंतु त्यापूर्वी पेरणी जितकी लवकर होईल तितकी तुरीच्या झाडाची वाढ जास्त होते. जून, जुलैच्या पावसावर ते पीक जोरदार वाढते.

२) सलग तूर पेरणीसाठी दोन ओळींतील आणि दोन झाडांतील अंतर ठरविणे गरजेचे आहे. त्यामुळे बियाण्याचे योग्य प्रमाण वापरून जास्त उत्पादन मिळू शकते.

३) जुलैच्या प्रथम आठवड्यातील पेरणीसाठी लवकर तयार होणाऱ्या आय.सी.पी.एल. ८७ किंवा टीएटी-१० सारख्या वाणांची ४५ बाय १० सें.मी. अंतराने पेरणी करावी. वीडीएन ७०८, पीकेव्ही तारा, विपुला, वीएसएमआर ८५३ या वाणांची ९०२० किंवा ६०३० सें.मी. अंतराने पेरणी करावी. आशा, सी ११ आणि वीएसएमआर ७३६ या वाणांची ६० बाय ६० सें.मी. किंवा १२० बाय ३० सें.मी. वर पेरण्याची शिफारस आहे. आंतरपीक पद्धतीमध्ये जोडीदार पिकांच्या ओळीच्या प्रमाणावर ओळीतील अंतर अवलंबून राहील. दोन झाडांतील अंतर पेरणीची वेळ आणि जमिनीच्या सुपीकतेचा विचार करून ठरवावे.

४) पीक पेरणीपासून सुमारे ९० ते ११० दिवसांपर्यंत तणमुक्त असावे. आंतरमशागतीमुळे जमिनीत हवा खेळती राहते. उपलब्ध पर्जन्यमानाप्रमाणे जलसंवर्धन होते आणि त्याद्वारे पिकाची वाढ चांगली होऊन उत्पन्न चांगले येते. विशेषतः मूग, उडीद किंवा सोयाबीनसारख्या अल्पमुदतीच्या आंतरपिकांची कापणी झाल्यावर आंतरमशागत करून ओळीतील जमीन भुसभुशीत राहील याची काळजी घ्यावी.

शक्य तेथे तुरीला मातीची भर देण्यासाठी कोळप्याच्या दात्यांना दोरी बांधून ओळीतील झाडांना भर देता येईल. त्याद्वारे डवरणीनंतर सरी ओरंबा तयार होतील. ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये क्वचित प्रसंगी पाऊस काही भागात पडण्याची शक्यता असते. त्याचे या सरीमध्ये संवर्धन होईल. जास्त झाल्यास सरीद्वारे निचरा होण्यास मदत होईल. पाऊस नसल्यास या सऱ्या उपलब्ध असल्यास ओलीत करण्यासदेखील उपयोगी असतील.

५) तूर पिकाला फुलोऱ्याच्या काळात जमिनीत योग्य ओलावा असणे फायदेशीर ठरते. पाण्याचा ताण पडल्यास फुलोऱ्यावर आणि शेंगांच्या वाढीच्या अवस्थेत एक किंवा दोन ओळींत केल्यास सुमारे ३० ते ५२ टक्के उत्पादन वाढते असे प्रयोगात आढळले आहे. ■



शेतकरी बंधूंनो, आपले शेतीतील यशस्वी प्रयोग, यशोगाथा, आपले अनुभव कृषिसंचार पुरवणीसाठी ९४२३२४८१४४ या व्हॉट्सॲप नंबरवर किंवा संपादक, दै. संचार, होटगी रोड सोलापूर-४१३००३ या पत्त्यावर पाठवावेत, आपल्या नावासह ते प्रसिद्ध केले जाईल.

# शेळ्या, मेंढ्यांचे पावसाळ्यातील व्यवस्थापन

**पावसाळा सुरू झाला की शेळ्या, मेंढ्यांमध्ये विविध आजारांचा प्रादुर्भाव वाढतो. हे टाळण्यासाठी योग्य व्यवस्थापन महत्त्वाचे आहे. गोठ्यातील दमट वातावरण आणि ओलाव्यामुळे अनेक प्रकारचे आजार होतात. श्वसनसंस्थेचे आजार होण्याची दाट शक्यता असते. ही आर्द्रता कमी ठेवण्यासाठी गोठ्यात रात्रीच्या वेळी शेगडी पेटवावी किंवा ६० वॉटचा विजेचा बल्ब लावावा.**

पावसाळ्यात गोठ्याच्या प्रवेशद्वाराजवळ चुना टाकावा. तसेच शेडमधील जमिनीवरही चुना टाकल्याने शेळ्यांना बाहेरून येणाऱ्या आजाराचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता कमी होते. दररोज स्वच्छता करून गोठा कोरडा ठेवावा.

गोठा ओला असल्यास खुरामध्ये ओलसरपणा राहून पायाला फोड येऊन त्या लंगडतात,ताप येतो,अशक्त होतात. पावसाळ्यामध्ये जखमांवर माश्या बसतात व तेथे अंडी घालतात त्यामुळे जखम वाढत जाते. माशांच्या नियंत्रणासाठी कडुनिंब, निरगुडी किंवा करंज पाला यांचा वापर करून गोठ्याचे निर्जंतुकीकरण करावे.



पावसाळ्यातील व्यवस्थापन- शेळ्यांना त्यांच्या वजनानुसार जंतनाशक शिफारशीत प्रमाणात देऊन जंतनिर्मूलन करून घ्यावे. कारण दमट हवामान जंताच्या वाढीसाठी उपयुक्त असते. शेळ्यांना पावसाळा सुरु होण्याअगोदर पशुवैद्यकाच्या सल्ल्याने वेळापत्रकानुसार लाळ्या खुरकुत, आंत्रविषार, घटसर्प, पीपीआर आजाराच्या नियंत्रणासाठी लसीकरण करावे. पावसाळ्यात खुरामध्ये जखमा होऊन त्या चिघळू शकतात. यासाठी अशा शेळ्यांना वाळलेल्या जागेत ठेवून त्या जखमा पोटॅशिअम परमॅग्नेटने धुवून त्यावर मलमपट्टी करावी.

पावसाळ्याच्या दिवसात शेळी खरेदी करणे टाळावे. कारण पावसाळ्यात आजार संक्रमण होण्याची शक्यता असते. जर मेंढी-शेळी खरेदी करणे खूपच गरजेची असेल तर जिथून शेळ्या खरेदी करायच्या आहेत, तेथे आजाराचा प्रादुर्भाव झालेला नाही याची तपासणी करावी. पावसाळ्यात शेळ्यांना धनुर्वात होण्याची दाट शक्यता असते. त्यामुळे लसीकरण करावे. पावसात जास्त वेळ भिजल्यास न्यूमोनियासारखा आजार होतो. यामुळे शेळी शिंकते, नाकातून चिकट हिरवा/पिवळसर द्रव वाहतो, ताप येतो, धाप लागते.

आहार नियोजन- शेळ्यांच्या शारीरिक स्थितीनुसार आवश्यक हिरवा आणि वाळलेला चारा तसेच संतुलित खुराक द्यावा. पावसाळा सुरू होण्याच्या दोन आठवड्यांपूर्वी मेंढी-शेळ्यांना त्यांच्या वजनानुसार हिरव्या चाऱ्यासोबत संतुलित खुराक दिल्यास पावसाळ्यात त्यांची प्रतिकारशक्ती उत्तम राहील. कोरडा चारा आणि इतर खाद्याची योग्य ठिकाणी साठवणूक करणे आवश्यक आहे. कारण त्यास बुरशी लागण्याची शक्यता असते. चाटण वीट किंवा खुराकामध्ये खनिज मिश्रण सुरू ठेवणे गरजेचे असते, कारण शेळ्या किंवा करडे खनिजांच्या अभावामुळे माती चाटतात. कोवळ्या चाऱ्यात तंतुमय पदार्थ कमी असतात.

जर असा चारा जास्त खाऊ घातला तर त्यांना अपचन होण्याची शक्यता जास्त असते. पोटफुगी, हगवण यांसारखे आजार होतात. तज्ज्ञांच्या सल्ल्याने उपाययोजना कराव्यात. बोकडांना देखील पावसाळा सुरू होण्यापूर्वी पंधरा दिवस तीनशे ते साडेतीनशे ग्रॅम प्रतिदिन खुराक दिल्यास वीर्याचे प्रमाण आणखी सुधारते. चारा कुट्टी करून खायला दिल्याने जमिनीवर चारा पडून तो खराब होत नाही. पावसाळ्यात शेळ्या, मेंढ्यांना दिले जाणारे पाणी स्वच्छ असावे. ■

# ऐतिहासिक 'रामशेज' लवकरच येणार

मराठी चित्रपटसृष्टीत छत्रपती शिवाजी महाराजांची यशोगाथा सांगणारे अनेक चित्रपट प्रदर्शित झाले आहेत. गेल्या काही वर्षात रिलीज झालेले 'फर्जंद', 'फत्तेशिकस्त', 'पावनखिंड', 'शेर शिवराज' या 'शिवराज अष्टक' चित्रपट मालिकेतील सिनेमांना प्रेक्षकांनी भरभरून प्रतिसाद दिला. यानंतर आता लवकरच छत्रपती शिवाजी महाराज आणि हिंदवी स्वराज्याची माहिती देणारा नवा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. नुकतीच या नव्या मराठी चित्रपटाची घोषणा करण्यात आली आहे. 'रामशेज' किल्ला नाशिकपासून १६ किलोमीटरच्या अंतरावर असून मराठ्यांनी साडेसहा वर्षं मुघलांविरुद्ध हा किल्ला लढवला होता. प्रभू श्रीराम श्रीलंकेला जात असताना त्यांचे या किल्ल्यावर वास्तव्य असल्याने या किल्ल्याचे नाव 'रामशेज' असे ठेवण्यात आले अशी आख्यायिका आहे. या आख्यायिकेप्रमाणे, चित्रपटाच्या पोस्टरमध्येही शिवाजी महाराजांचा मावळा आणि त्यामागे प्रभू श्रीरामांची छाया दाखवण्यात आली आहे. 'रामशेज' चित्रपटात अभिनेता अंकित मोहन प्रमुख भूमिका साकारणार असून हरीश दुधाडे, प्राजक्ता गायकवाड यांच्याही चित्रपटात महत्त्वाच्या भूमिका आहेत. लवकरच चित्रपटाचे शूटिंग सुरू होईल. 'हर हर महादेव' अशी माहिती अंकित मोहनने पोस्ट शेअर करीत दिली आहे. दरम्यान, 'रामशेज'ची घोषणा केल्यावर शिवप्रेमींनी या चित्रपटावर शुभेच्छांचा वर्षाव केला आहे. ●




सिनेसंचार

# सारा करणार क्रिकेटरसोबत लग्न ?

अभिनेत्री सारा अली खान सध्या 'जरा हटके जरा बचके' चित्रपटामुळे चर्चेत आहे. गेल्या काही दिवसांपासून तिचे नाव क्रिकेटर शुभमन गिलसोबत जोडले आहे. मात्र नुकतेच साराने एका मुलाखतीत तिला नवरा म्हणून कसा मुलगा हवा याबाबत स्पष्ट सांगितले आहे. त्या मुलाखतीत साराला 'तुझी आजी शर्मिला टागोर यांच्या पावलावर पाऊल टाकत तू पण क्रिकेटरशी लग्न करणार का?' असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर ती म्हणाली की, 'ती व्यक्ती अभिनेता, क्रिकेटर, व्यावसायिक किंवा डॉक्टर काहीही असू द्या. पण त्या व्यक्तीने मानसिक आणि बौद्धिक पातळीवर माझ्याशी जुळवून घेतले पाहिजे. एखादा व्यक्ती कोण आहे किंवा काय करतो यापेक्षा माझ्यासाठी ही गोष्ट महत्त्वाची आहे, असे स्पष्ट मत साराने व्यक्त केले. पुढे तिला 'भारतीय टीमधील कोणत्या क्रिकेटरला डेट करतेय का?' असा प्रश्न विचारला. त्यावर तिने 'ज्या व्यक्तीसोबत मला संपूर्ण आयुष्य काढायचं आहे त्याला ती अजून भेटलेली नाही,' असे उत्तर दिले. दरम्यान, शुभमन आणि साराने एकमेकांना इंस्टाग्रामवर अनफॉलो केल्याचे वृत्त समोर आले होते. ●



फिल्मी किस्सा

# संजय दत्त करणार होता ऋषी कपूर यांना मारहाण



कलाविश्वात कधी कोणाची चांगली मैत्री होईल आणि कधी कोणात शत्रुत्व निर्माण होईल याचा काही नेम नाही. त्यामुळे कलाविश्वातील अनेक सेलिब्रिटींचे कायम किस्से रंगत असतात. यात सध्या अभिनेता संजय दत्त आणि दिवंगत अभिनेता ऋषी कपूर यांच्यातील वादाचा किस्सा रंगला आहे.

एकेकाळी एका अभिनेत्रीसाठी संजय दत्त चक्क ऋषी कपूर यांना मारायला निघाला होता. रॉकी या सिनेमातून बॉलिवूडमध्ये पदार्पण करणाऱ्या संजय दत्तने अल्पावधीत लोकप्रियता मिळवली होती. या सिनेमात त्याच्यासोबत अभिनेत्री टीना मुनीम हिने स्क्रीन शेअर केली होती. विशेष म्हणजे पहिल्याच चित्रपटामध्ये संजय टीनाच्या प्रेमात पडला. त्यामुळे त्यांच्या अफेअर्सच्या अनेक चर्चा त्या काळात रंगल्या होत्या. परंतु, या लव्हस्टोरीमध्ये ऋषी कपूर यांची एन्ट्री झाली आणि या दोन्ही अभिनेत्यांमध्ये वादाची ठिणगी पडली. त्या दिवसांमध्ये टीना मुनीमने ऋषी कपूरसोबतही अनेक सिनेमे केले होते. त्यामुळे यांच्या जोडीला प्रेक्षकांची अधिक पसंती मिळाली होती. इतकंच नाही तर त्यांच्या अफेअर्सच्याही चर्चा रंगल्या होत्या. मीडियामध्ये सुध्दा त्यांच्या नात्याविषयी बरीच चर्चा झाली होती. ही चर्चा वाचून संजय दत्त प्रचंड संतापला.

ऋषी कपूरसोबत टीनाचे नाव जोडले जाणे संजयला मान्य नव्हते. त्यामुळे टीनापासून दूर राहा अशी समज देण्यासाठी संजय दत्त हा ऋषी कपूर यांच्या घरी निघाले. त्यावेळी तो दारुच्या नशेत होता. संजय दारुच्या नशेत असल्यामुळे अभिनेता गुलशन ग्रोवरदेखील त्याच्यासोबत त्याला सावरायला गेले होते. यावेळी ऋषी कपूरच्या घरी न जाता तो थेट नीतू सिंग यांच्या घरी गेला आणि घडलेला प्रकार सांगितला. परंतु, यावेळी नीतू कपूर यांनी परिस्थिती नीट हाताळली आणि संजयचा राग शांत केला. दरम्यान, पुढे नीतू सिंग आणि ऋषी कपूर यांचे लग्न झाले आणि सगळं चित्र स्पष्ट झालं. हा प्रसंग ऋषी कपूर यांच्या 'खुल्लम खुल्ला' या आत्मचरित्रपर पुस्तकात लिहिण्यात आला आहे. ●



# मी तिरुपतीमध्ये करणार लग्न!

बॉलिवूड आणि साऊथ अभिनेता प्रभास सध्या 'आदिपुरुष' चित्रपटामुळे चर्चेत आहे. या चित्रपटात प्रभाससोबत क्रिती सेनन, सैफ अली खान आणि सनी सिंग दिसणार आहेत. या चित्रपटाचा ट्रेलर लॉन्च कार्यक्रम तिरुपती येथे आयोजित केला होता, ज्यामध्ये प्रभास आणि क्रिती सेननदेखील सामील झाले होते. यादरम्यान, प्रभास आनंदी मूडमध्ये दिसला आणि चाहत्यांच्या प्रश्नांना उत्तर देताना त्याने लग्नाबद्दल एक मोठी गोष्ट सांगितली. तो म्हणाला, 'मी तिरुपतीमध्ये लग्न करणार आहे'. हे ऐकल्यानंतर चाहत्यांना त्यांच्या लग्नाची उत्सुकता लागली. प्रभासने चाहत्यांना वचन दिले की, 'तो दरवर्षी दोन चित्रपट नक्कीच करेल आणि शक्य झाल्यास तो तिसरा चित्रपट देखील करेल. इतकेच नव्हे तर, कार्यक्रमापूर्वी प्रभास तिरुमला येथे दर्शन घेण्यासाठी गेला होता. यावेळी अभिनेता पारंपरिक पोशाखात दिसला असून मंदिरात जाण्यासाठी त्यांनी पांढरी लुंगी आणि शर्ट परिधान केला होता. त्याची एक झलक पाहण्यासाठी त्याच्या चाहत्यांची तेथे मोठी गर्दी झाली होती. 'आदिपुरुष'चे दिग्दर्शन ओम राऊत यांनी केले आहे. ●

# अपारशक्ती खुरानाच्या झोळीत स्त्री-२



पॉवरपॅक परफॉर्मर अशी अनोखी ओळख जपणारा अपारशक्ती खुराना सध्या चर्चेत आहे. वेगवेगळ्या भूमिकांमधून नेहमीच प्रेक्षकांची मने जिंकून घेत अभिनेता अपारशक्ती खुराना चर्चेचा विषय ठरतो. प्रतिभावान अभिनेता तर तो आहेच. पण चित्रपटाच्या सोबतीने अपारशक्ती खुराना त्याच्या नव्या वेबसीरीज ज्युबिलीमध्ये अगदीच चमकला आहे. अपारशक्ती खुराना स्त्री, लुका छुप्पी आणि पती, पत्नी आणि वो सारख्या हिट चित्रपटांचा अविभाज्य भाग ठरला आहे. १९४० च्या दशकात सुपरस्टार मदन कुमारची भूमिका त्याने साकारली होती. ॲमेझॉन प्राईम व्हिडिओवरील जुबली या त्याच्या नव्या सीरिजमधील भूमिकेसाठी अपारशक्तीचे कौतुक होत आहे. अपारशक्तीने त्याच्या या रोलसाठी मेहनत घेऊन चाहत्यांना आश्चर्यचकित केले आहे. त्याच्या या भूमिकेसाठी प्रेक्षकांनी काय यांनी काय सांगितले ते बघूया. एका चाहत्याने ट्विट केले की, ज्युबिलीमधील त्याच्या भूमिकेत अपारशक्ती खुराना चमकत आहे, हे दाखवून देतो की तो केवळ कॉमिक अभिनेता नाही. आपल्या कामगिरीने तो कोणत्याही भूमिकेला कौशल्याने आणि चोखपणे हाताळू शकतो हे त्याने सिद्ध केले आहे. दुसऱ्या चाहत्याने लिहिले, ज्युबिलीमध्ये अपारशक्ती खुराणाने एक उत्तम अभिनेता म्हणून आपली क्षमता सिद्ध केली. अपारशक्ती त्याच्या कारकिर्दीतील एका सर्वोत्तम टप्प्यात आहे. आपार शक्तीकडे सध्या बर्लिन, ज्युबिलीचे लेखक अतुल सबरवाल यांनी लिहिलेले आणि दिग्दर्शित केलेले, फायडिंग राम सारखे अनेक प्रोजेक्ट्स आहेत. ●